मराठी न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडच्या विकास आराखड्याला वेग

## सुधारित विकास आराखड्यावरील हरकतींची सुनावणी आकुर्डीत; 15 डिसेंबरपर्यंत राज्य सरकारकडे डीपी सादर करण्याचे नियोजन




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारुप विकास योजना आराखड्यावर (डीपी प्लान) प्राप्त झालेल्या तब्बल 56 हजार 771 हरकती प्राप्त झाल्या आहेत. त्यावर आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात लवकरच सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेचा नगर रचना विभाग तेथे हलविण्यात येणार असून, मोठे व लहान असे दोन्ही नाट्यगृह तब्बल सहा महिने बंद ठेवण्यात येणार आहे. त्या काळात कोणालाही नाट्यगृह भाड्याने दिले जाणार नाही.

महापालिकेकडून सुधारित प्रारुप विकास योजना आराखडा 15 मे 2025 ला प्रसिद्ध करण्यात आला. त्यावर 14 जुलै 2025 पर्यंत हरकती व सूचना स्वीकारण्यात आल्या. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. तब्बल 56 हजार 779 जणांनी हरकती नोंदवल्या आहेत. हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी समिती स्थापन करण्यास महापालिका सर्वसाधारण सभेने 15 मे 2026 ला मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरच सुनावणी प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

सुनावणी सुरू करण्यापूर्वी हरकत नोंदवलेल्या नागरिकांना टपालाने नोटीस पाठवून सुनावणीचे ठिकाण, वेळ व दिनांक कळवण्यात येते; तसेच सुनावणीच्या वेळी हरकतदारांच्या उपस्थितीच्या नोंदी घेण्यासाठी याद्या तयार करण्याचे काम बाकी आहे. सुनावणीसाठी आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह 1 जुलै ते 31 डिसेंबर असे सहा महिन्यांसाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्या काळात नाट्यगृह कोणालाही भाड्याने दिले जाणार नाही. त्यामुळे तेथे कोणतेही कार्यक्रम होणार नाहीत.

सुनावणी प्रक्रियेसाठी तेथे आवश्यक फर्निचर, टेबल व स्टेशनरी साहित्य उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत; तसेच नगररचना विभागाचे उपसंचालक, नगररचनाकार, सहाय्यक नगररचनाकार, कनिष्ठ आरेखक, वरिष्ठ लिपिक, कंत्राटी लिपिक, कंत्राटी तांत्रिक व्यक्तीची नेमणूक केली जाणार आहे. त्या दृष्टीने महापालिका प्रशासन तसेच, संबंधित विभागाकडून आवश्यक मनुष्यबळ व साहित्यसामग्री उपलब्ध करून देण्यात येत आहे.


सुधारित प्रारुप विकास योजना आराखड्यावर 3 ऑगस्टपासून प्रत्यक्ष सुनावणी घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यासाठीच्या प्रक्रियेपूर्वीची तयारी करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार मनुष्यबळ नियुक्ती तसेच, साधनसामग्रीची प्रक्रिया सुरू आहे, असे महापालिकेच्या विशेष नियोजन विभागाच्या उपसंचालक अनुपमा कुलकर्णी यांनी सांगितले.

### सुनावणीसाठी सात सदस्यीय समिती

**» सुनावणी समितीमध्ये नगर रचना विभागाचे निवृत्त सहसंचालक प्रकाश भुक्ते, निवृत्त उपसंचालक दत्तात्रय पवार, निवृत्त उपसंचालक उत्तरेश्वर लोंढे, पर्यावरण अभियंता नरसू शिंदे या चार तज्ज्ञांचा समावेश आहे. त्या समितीमध्ये स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, समिती सदस्य संदीप कस्पटे व सारिका गायकवाड यांची सदस्य म्हणून नियुक्तीस सर्वसाधारण सभेने १५ मे २०२६ मंजुरी दिली आहे. त्या सात जणांच्या सुनावणी समितीमार्फत प्रत्यक्ष सुनावणी घेतली जाणार आहे. ती प्रक्रिया चार महिने चालेल, असा सांगितले जात आहे.**

# पवना धरण 92.55 टक्के भरले; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

## मुसळधार पावसामुळे धरणात वेगाने पाण्याची आवक; कोणत्याही क्षणी नदीपात्रात विसर्गाची शक्यता



**पुणे | प्रतिनिधी**

पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच घाटमाथ्यावर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढत असून गुरुवारी सकाळी 11 वाजेपर्यंत धरण 92.55 टक्के भरले आहे. या पार्श्वभूमीवर पवना धरण प्रकल्प प्रशासनाने पवना नदीकाठच्या ग्रामस्थ, नागरिक, शेतकरी आणि लाभधारकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

धरण परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे धरणात सातत्याने पाण्याची आवक होत आहे. धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोणत्याही क्षणी पवना नदीपात्रात कमी-अधिक प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्याची आवश्यकता निर्माण होऊ शकते. विसर्ग करण्यापूर्वी जलसंपदा विभागामार्फत आवश्यक माहिती आणि सूचना प्रसारित करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सततच्या पर्जन्यवृष्टीमुळे नदी, नाले आणि ओढ्यांमधील पाणीपातळी अचानक वाढण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नदीपात्रात ठेवलेले साहित्य, शेतीची अवजारे, कृषी पंप आणि जनावरे तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावीत, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. स्थानिक जिल्हा व तालुका प्रशासनाला आवश्यक ते सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. पवना धरणातील पाणीसाठा 92 टक्क्यांहून अधिक झाल्याने नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कतेचे वातावरण असून प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

पवना धरणातील पाणीसाठा ९२.५५ टक्क्यांवर पोहोचल्याने नदीपात्रात कोणत्याही क्षणी कमी-अधिक प्रमाणात पाण्याचा विसर्ग केला जाऊ शकतो. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे प्रशासनाने आवाहन केले आहे. नदीपात्रात ठेवलेले शेती साहित्य, कृषी पंप, जनावरे आणि इतर मौल्यवान वस्तू तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवाव्यात. अफवांवर विश्वास न ठेवता केवळ प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. जिल्हा प्रशासन, जलसंपदा विभाग आणि स्थानिक यंत्रणांशी समन्वय ठेवून आवश्यक खबरदारी घ्यावी. सततच्या पावसामुळे नदी, नाले व ओढ्यांमधील पाणीपातळी अचानक वाढू शकते, त्यामुळे अनावश्यकपणे नदीपात्रात जाणे टाळावे.

# महापालिका भवनात अजितदादा पवार, लक्ष्मण जगताप यांची तैलचित्रे; स्थायी समितीची मंजुरी

## अहिल्यादेवी होळकर यांच्या तैलचित्रालाही उमेद मान्यता; 730 नवीन खुर्च्या, पालखी मार्ग टॉयलेट व इतर खर्चांनाही हिरवा कंदील

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका भवनाच्या दर्शनी भागात तळमजल्यावर दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे तैलचित्र झळकणार आहे. तसेच, भाजपाचे दिवगंत आमदार लक्ष्मण जगताप यांचेही तैलचित्र लावले जाणार आहे. उमेद मान्यतेवर महापालिका भवनातील यशवंतराव चव्हाण सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र लावण्यात येणार आहे. त्यासह विविध कामांच्या खर्चाला स्थायी समितीने बुधवार (दि. २२) मान्यता दिली आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच, दिवगंत आमदार लक्ष्मण जगताप यांचेही तैलचित्र महापालिकेच्या दर्शनी भागात लावण्यास सर्वसाधारण सभेने १३ मार्च २०२६ ला मंजुरी दिली आहे. तर, महापौर रवी लांडगे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र सभागृहात लावण्याची विनंती १८ मे २०२६ च्या पत्राद्वारे केली आहे. त्याला अद्याप सर्वसाधारण सभेची मान्यता नाही. उमेद मान्यतेवर अहिल्यादेवी होळकर यांच्यासह अजित पवार व लक्ष्मण जगताप यांच्या तैलचित्र तयार करण्याच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली आहे. एका तैलचित्रासाठी ४ लाख २५ हजार रुपये खर्च आहे. महापालिकेच्या दर्शनी भागात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र लावले आहे. ते तैलचित्र काढणारे चित्रकार सुनील शेगावकर यांनाच ते काम थेट पद्धतीने देण्यात आले आहे.

महापालिकेच्या ८५ प्राथमिक शाळा इमारतींमध्ये मुख्याध्यापकांचे मदतनीस म्हणून ७० सफाई सेवक व एक निवासी रखवालदार नेमलेला आहे. त्यांच्या १५ महिन्यांच्या वेतनासाठी २ कोटी ६६ लाख १ हजार ८१० रुपये खर्च आहे. दुर्गा टेकडीच्या ५० वर्षांचा इतिहास या पुस्तकाच्या १०० प्रती खरेदीस ७ लाख ३५ हजार रुपये खर्च आहे. आरोग्य विभागाच्या कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांवर व्हीटीएम यंत्रणा बसविण्याच्या कामास दुसरी मुदतवाढ देण्यात आली असून, त्याला २५ लाख ४५ हजार रुपये खर्च आहे. यासह विविध कामांच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आषाढी पालखी सोहळ्यानिमित्त पालखी मार्गावर व मुक्काच्या ठिकाणी पोर्टेबल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली होती. प्रतिदिन प्रतिपोर्टेबल टॉयलेटसाठी १ हजार ६४५ रुपये दर होता. त्यानुसार, एकूण १ कोटी ५१ लाख ८७ हजार रुपये खर्चास समितीने मंजुरी दिली आहे.



### रावेतमधील सेक्टर ३२ येथे स्मशानभूमी विकसित करणार

» रावेत येथील सेक्टर क्रमांक ३२ येथे पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या आराखड्यातील स्मशानभूमीचे आरक्षण महापालिका विकसित करणार आहे. त्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती केली होती. मात्र, परिसरातील सोसायटीधारकांनी त्याला हरकत घेतली. ते प्रकरण राष्ट्रीय हरित लवादात गेले. लवादाने दिलेल्या आदेशानुसार नीरी संस्थेमार्फत प्रत्यक्ष जागेची पाहणी करण्यात आली. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार स्मशानभूमी बांधण्यात येणार आहे. ते काम त्याच आर्किटेक्टला थेट पद्धतीने देण्यात आले आहे. त्या एजन्सीला एकूण निविदा रकमेच्या १. ९० टक्के शुल्क दिले जाणार आहे. त्यास समितीने मान्यता दिली आहे

### पुन्हा १८ लाखांच्या ७३० खुर्च्यांची खरेदी

» महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर विविध विभागांसाठी तब्बल १ हजार १२७ खुर्च्यांची खरेदी करण्यात आली. मध्यवर्ती भांडार विभागाने सांगवी येथील इंद्रनिल टेक्नॉलॉजीज पुरवठादाराकडून ८ हजार ५२५ रुपये दराने एकूण ९६ लाख ३५ हजार ८५० रुपये खर्चास स्थायी समितीने मार्च महिन्यातील सभेत मंजुरी दिली होती. पुन्हा ७३० खुर्च्यांच्या खरेदीस समितीने मंजुरी दिली आहे. मुंबईतील विमप्लेट लिमिटेडकडून २ हजार ४१७ रुपये ८१ पैसे दराने त्यावर एकूण १७ लाख ६५ हजार रुपये खर्च केला जाणार आहे.

### मेट्रो डीपीआरचा प्रस्ताव तहकूब

» पुणे-नाशिक महामार्ग ते मुंबई-बंगळूर महामार्गास जोडणाऱ्या बीआरटीएस मार्गावर (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रॉन्झिट सिस्टीम) इलेक्ट्रिक मेट्रो सुरू करण्याचे नियोजन आहे. पुणे-नाशिक महामार्ग ते मुंबई बंगळूर महामार्गास जोडणाऱ्या भोसरीतील गोडाऊन चौक, नाशिक महामार्ग, कुदळवाडी चौक, ऑटो क्लस्टर, काळेवाडी फाटा चौक, जगताप डेअरी चौक, वाकड चौक या बीआरटीएस मार्गावर मेट्रो मार्गाचे नियोजन करण्यात आले आहेत. त्याचा डीपीआर तयार करण्यास ८५ लाख ४१ हजार ९८५ रुपये खर्च असून, तो प्रस्ताव समितीने तहकूब केला आहे.

# काळेवाडी कचरा संकलन केंद्राची स्थायी सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून पाहणी

## भविष्यातील लोकसंख्या वाढीचा विचार करून सक्षम नियोजन करण्याचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

"स्वच्छ शहर, सक्षम नियोजन आणि पर्यावरणपूरक भविष्य – हीच आपली दिशा!" या धोरणाला प्रत्यक्षात आणण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जोरदार पावले उचलली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज काळेवाडी येथील एम.एम. कॉलेजजवळील कचरा संकलन केंद्राला थेट भेट दिली आणि तेथील संपूर्ण कामकाजाची पाहणी केली.

या पाहणी दरम्यान सभापतींनी कचरा व्यवस्थापनाच्या प्रत्येक टप्प्याची सविस्तर माहिती घेतली. शहरातून गोळा होणारा ओला व सुका कचरा कशा पद्धतीने गोळा केला जातो, केंद्रावर त्याचे वर्गीकरण कसे होते आणि त्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करून विल्हेवाट कशी लावली जाते, याचा आढावा त्यांनी घेतला. तसेच, कचरा संकलन केंद्राचा परिसर आणि आजूबाजूच्या भागात उत्तम स्वच्छता राखली जावी, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवर्जून सूचना दिल्या.



> या दौऱ्यामुळे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असून, थेरगाव आणि काळेवाडी परिसरातील नागरिकांना स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी वातावरण मिळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.
>
> - अभिषेक बारणे, सभापती – स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

शहराचा विस्तार वेगाने होत असून आगामी काळात लोकसंख्या आणखी वाढणार आहे, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाणही वाढणार आहे. ही भविष्यातील गरज लक्षात घेऊन आतापासूनच घनकचरा व्यवस्थापनाचे अधिक सक्षम आणि दूरगामी नियोजन करावे, असे स्पष्ट निर्देश सभापती अभिषेक बारणे यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. कचरा प्रक्रिया करणारी यंत्रणा अधिकाधिक गतिमान व प्रभावी ठेवण्यावर महापालिकेचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.

# पुणे शहरात केवळ 54 खड्डे! महापालिकेचा दावा

**पुणे शहरात पावसामुळे रस्त्यांची दुर्दशा झाली असताना, शहरात केवळ 54 खड्डेच शिल्लक असल्याचा अजब दावा महापालिकेच्या पथ विभागाने केला आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे रस्त्यांच्या कामाचा दर्जा उघड झाला. शहरात अनेक ठिकाणी नागरिकांना खड्ड्यांमधून वाहने चालवावी लागत असताना शहरात केवळ ५४ खड्डेच शिल्लक असल्याचा अजब दावा महापालिकेच्या पथ विभागाने केला आहे.

'रस्त्यांवर खड्डे पडल्याच्या तक्रारी आल्यानंतर खड्डे दुरुस्तीसाठी महापालिका तत्पर असून, गेल्या १५ दिवसांत १,१८८ खड्ड्यांपैकी १,१३४ खड्ड्यांची दुरुस्ती प्रशासनाने केली. आता केवळ ५४ खड्डेच शहरात शिल्लक राहिले असून, तेदेखील १ ऑगस्टपर्यंत बुजविले जातील,' असे पथ विभागाचे प्रमुख राजेश बनकर यांनी सांगितले. महापालिका प्रशासनाने केलेल्या दाव्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पुणे महापालिकेने ७ ते २१ जुलै या काळात कोल्ड मिक्स बॅगद्वारे ६३४ चौरसमीटर तर हॉटमिक्स प्लांटच्या माध्यमातून २ हजार ०८८ चौरस मीटर डांबरीकरण करण्यात आल्याचा दावा केला. रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी १६२ ठिकाणी पाण्याचा निचरा करण्यात आला.




## कोणत्या भागात किती खड्डे बुजवले?

» महापालिकेच्या अहवालानुसार सर्वाधिक ३५८ खड्डे कोंढवा-धनकवडी भागात बुजविण्यात आले. वानवडीमध्ये १९४, हडपसर-मांजरीमध्ये १२७, वारजे-कर्वेनगरमध्ये १०४, बिबवेवाडीत ७३, कोथरूड-बावधनमध्ये ६८, औंध-बाणेरमध्ये ५९, सिंहगड रस्ता परिसरात २६, येरवडा-वडगावशेरीमध्ये ३५ आणि नगररस्त्यावर १३ खड्ड्यांची दुरुस्ती करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच १६२ ठिकाणी पाण्याचा निचरा करून रस्ते दुरुस्तीची कामे करण्यात आली.

८५७ चौरस मीटर क्षेत्रात मुरूम, जीएसबी साहित्याचा वापर करण्यात आला.

पेव्हिंग ब्लॉक वापरून ६२ चौरस मीटर क्षेत्रातील दुरुस्ती करण्यात आल्याचे महापालिकेने तयार केलेल्या अहवालामध्ये स्पष्ट करण्यात आले. महापालिकेने तयार केलेल्या अहवालानुसार सर्वाधिक खड्डे वानवडी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत होते. येथे १९४ पैकी १९४ खड्डे बुजविण्यात आले. कोंढवा-धनकवडी भागात ३५८, हडपसर-मांजरीमध्ये १२७, वारजे-कर्वेनगरमध्ये १०४, कोथरूड-बावधनमध्ये ६८, औंध-बाणेरमध्ये ५९, तर बिबवेवाडीमध्ये ७३, सिंहगड रस्ता २६, येरवडा-वडगावशेरी येथे ३५ आणि नगररोड येथे १३ खड्ड्यांची दुरुस्ती करण्यात आल्याचे महापालिकेच्या अहवालात म्हटले आहे.

पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे म्हणाले, रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. अनेक कर्मचारी, अधिकारी सध्या 'मतदार यादी पुनरीक्षण' (एसआयआर) कामात गुंतले आहेत. त्यामुळे खड्डे दुरुस्तीत अडचणी येत आहेत. एक ऑगस्टपर्यंत शहरातील सर्व खड्डे बुजविले जातील.

महापालिकेने रस्त्यांवरील खड्डे बुजवले जात असल्याचा दावा केला असला तरी या दाव्यांनंतरही शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर आणि महत्त्वाच्या चौकांमध्ये असंख्य वाहनचालकांना रोज खड्ड्यांचा सामना करावा लागत आहे.

## महापालिकेचा ५४ खड्ड्यांचा दावा

» पुणे महापालिकेच्या पथ विभागाने शहरात केवळ ५४ खड्डे शिल्लक असल्याचा दावा केला आहे. गेल्या १५ दिवसांत १,१८८ पैकी १,१३४ खड्डे बुजविण्यात आल्याची माहिती पथ विभागप्रमुख राजेश बनकर यांनी दिली. उर्वरित खड्डे १ ऑगस्टपर्यंत दुरुस्त केले जातील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कोल्ड मिक्स, हॉटमिक्स, पेव्हिंग ब्लॉक आणि मुरूमाचा वापर करून विविध भागांतील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

## प्रत्यक्ष स्थितीवर नागरिकांचे प्रश्न

» महापालिकेच्या दाव्यानंतरही शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर मोठे खड्डे कायम असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या आकडेवारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पावसात कोल्ड मिक्सने बुजवलेले खड्डे पुन्हा उखडत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) कामामुळे मनुष्यबळावर ताण असल्याचे सांगितले असले, तरी खड्डेमुक्त शहराचा दावा आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये मोठी तफावत असल्याची टीका वाहनचालकांकडून होत आहे.

---

# शहरात सध्या पाणीकपात नाही; नियमित पाणीपुरवठा सुरू

**धरणांतील पाणीसाठ्यात वाढ झाल्याने पाणीकपात टळली; अफवांवर विश्वास ठेवू नका, महापौर मंजूषा नागपुरे यांचे आवाहन**

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांना सध्या कोणत्याही प्रकारच्या पाणीकपातीचा सामना करावा लागत नसून, शहरात नियमित व नियोजनबद्ध पाणीपुरवठा सुरू आहे, अशी स्पष्ट माहिती महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिली. धरणक्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे पाणीसाठ्यात वाढ होत असल्याने तातडीने पाणीकपात लागू करण्याची आवश्यकता नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेने गेल्या आठवड्यात धरणांतील पाणीसाठा आणि पावसाच्या स्थितीचा आढावा घेऊन २२ जुलैनंतर पाणीकपात पुन्हा सुरू



करायची की नाही, याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगितले होते.

मात्र, गेल्या दोन दिवसांपासून शहरासह धरण परिसरात समाधानकारक पाऊस पडत असल्याने सध्याच्या स्थितीत पुणेकरांना नेहमीप्रमाणेच पाणीपुरवठा केला जात आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत शहरातील सर्व भागांमध्ये वेळापत्रकानुसार पाणी वितरित केले जात आहे. वितरण यंत्रणा, जलशुद्धीकरण केंद्रे आणि धरणांतील उपलब्ध साठा यांचा दररोज आढावा घेतला जात असून, कुठेही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास तातडीने दुरुस्ती व पर्यायी व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

सध्या खडकवासला धरणसाखळीतील चारही धरणांमधील एकूण पाणीसाठा जवळपास २० टीएमसीपर्यंत पोहोचला आहे. पावसामुळे परिस्थितीत सुधारणा झाली असली तरी नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने व जबाबदारीने करावा, असे आवाहन महापौरांनी केले. तसेच, पाणीकपातीबाबत सोशल मीडियावर फिरणाऱ्या अप्रमाणित संदेशांवर विश्वास ठेवू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

> "धरणक्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे पाणीसाठ्यात समाधानकारक वाढ होत आहे. त्यामुळे सध्या शहरात कोणतीही पाणीकपात लागू केलेली नाही आणि नागरिकांना नेहमीप्रमाणे अखंड पाणीपुरवठा केला जात आहे. महानगरपालिका पाणीस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून, पुणेकरांना पुरेसा व नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.
>
> **- मंजूषा नागपुरे, महापौर**

# "अजितदादांचे विचार अन् दूरदृष्टी राज्याला सदैव मार्गदर्शक!" सुनील तटकरे यांचे भावूक उद्गार

## स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळातर्फे पुणे ते बारामती राष्ट्रीय व राज्यस्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन.

**पुणे | प्रतिनिधी**

राजकीय, सामाजिक, क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातील अजितदादांचे योगदान आणि दूरदृष्टी राज्याला सदैव मार्गदर्शक ठरेल. त्यांच्या निधनाने राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. दादांच्या विचारांचा वारसा आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची गौरवास्पद वाटचाल पुढेही सुरू राहील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.

माजी उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया व सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने पुणे ते बारामती या राष्ट्रीय राज्यस्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन केले. मान्यवरांच्या हस्ते दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन शनिवारवाडा येथे तटकरे यांच्या हस्ते झाले.



### राष्ट्रीय सायकल स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

» पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित पुणे-बारामती राष्ट्रीय व राज्यस्तरीय सायकल स्पर्धेला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने झालेल्या स्पर्धेत ४२५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सायकलपटूंनी सहभाग घेतला. उद्घाटन शनिवारवाडा येथे तर मुख्य स्पर्धेचे उद्घाटन हडपसर येथे झाले. या स्पर्धेच्या माध्यमातून क्रीडा संस्कृतीला चालना मिळाल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, भाजप प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, आमदार शंकर मांडेकर, बापूसाहेब पठारे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पुणे शहर अध्यक्ष सुनील टिंगरे, संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अँड. संदीप कदम, खजिनदार अँड. मोहनराव देशमुख उपस्थित होते.

अँड. संदीप कदम यांनी आरोग्य, वाहतूक, पर्यावरण आणि स्वच्छतेच्या गंभीर समस्यांवर प्रकाश टाकत, रॅलीतून प्लास्टिकमुक्ती, प्रदूषण नियंत्रण आणि स्वच्छतेचा संदेश दिल्याचे स्पष्ट केले. रॅलीत साडेतीन हजारहून अधिक विद्यार्थी, शिक्षक, नागरिक सहभागी झाले. मुख्य स्पर्धेत देशातील ४२५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन लगड यांनी केले. आभार माजी आमदार विलास लांडे यांनी मानले.

### अजितदादांच्या कार्याचा गौरव

» माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. राजकीय, सामाजिक, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात अजितदादांनी दिलेले योगदान राज्यासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या माध्यमातून सुरू झालेली विकासाची वाटचाल आणि दादांच्या विचारांचा वारसा पुढेही कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

### स्वच्छता आणि पर्यावरणाचा संदेश

» स्पर्धेसोबत काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीत साडेतीन हजारांहून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक सहभागी झाले. प्लास्टिकमुक्ती, पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, स्वच्छता आणि सुरक्षित वाहतुकीचा संदेश या रॅलीतून देण्यात आला. मानद सचिव अँड. संदीप कदम यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी माजी आमदार विलास लांडे यांनी आभार मानले, तर विविध मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# खडकवासला धरणसाखळीत 24 तासांत 2.14 टीएमसी पाण्याची वाढ; मुठा नदीत पाणी सोडण्याची शक्यता

## धरणसाखळीतील पाणीसाठा 69.17 टक्क्यांवर; पानशेत, वरसगाव आणि टेमघर वेगाने भरत असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील घाटमाथ्यासह पानशेत-मुठा खोऱ्यात बुधवारी (दि. २२) सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. नद्या, ओढे-नाले दुथडी भरून वाहत असल्याने धरणसाठ्यात पाण्याची आवक वेगाने वाढली असून, गेल्या २४ तासांत खडकवासला धरणसाखळीत तब्बल २.१४ टीएमसी पाण्याची वाढ झाली. सायंकाळी ५ वाजता धरणसाखळीत २०.१६ टीएमसी म्हणजे ६९.१७ टक्के पाणीसाठा झाला होता. खडकवासला धरणातून मुठा नदीत पाणी सोडले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील घाटमाथ्यालगतच्या परिसरात पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे धरणसाठ्यात पाण्याची आवक वाढली आहे. खडकवासला धरण जवळपास ८० टक्के भरले आहे. धरणात येणाऱ्या पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे ९० टक्के साठा झाल्यावर खडकवासलातून मुठा नदीच्या पात्रात पाणी सोडले जाणार आहे.

पानशेत जवळपास ७५ टक्के तर वरसगाव जवळपास ७० टक्के भरले आहे. टेमघरने पन्नाशी ओलांडली आहे. खडकवासला, सिंहगड भागात अधूनमधून उघडीपीनंतर रिमझिम पाऊस पडत आहे; मात्र वरसगाव, टेमघर व पानशेत धरण क्षेत्रासह घाटमाथ्यालगतच्या परिसरात पावसाची संततधार सुरू आहे. पावसाचा जोर वाढला आहे. मोसे, आंबी व मुठा नदी, ओढे-नाले दुथडी भरून वाहू लागल्या आहेत.

मंगळवारी (दि. २१) रात्रीपासून घाटमाथ्यावर जोरदार पाऊस पडत आहे. पानशेत, वरसगाव व टेमघर या तिन्ही धरणांत १०० टक्के साठा केला जात आहे. सध्या पडत असलेल्या पावसाचा जोर कायम राहिल्यास चार पाच दिवसात तिन्ही धरणे शंभर टक्के भरण्याची शक्यता खडकवासला जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे. मंगळवारी सकाळी ६ ते बुधवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंतच्या ३५ तासात टेमघर येथे विक्रमी २४२ मिलिमीटर पाऊस पडला.

> खडकवासलात दुपारनंतर पावसाचा जोर थोडा कमी झाला. त्यामुळे पाण्याची आवकही थोडी कमी झाली आहे; मात्र धरणसाठ्यात पाण्याची वाढ सुरू आहे. ९० टक्के पाणीसाठा झाल्यावर खडकवासलातून मुठा नदीत पाणी सोडले जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.
>
> - किरण देशमुख, कार्यकारी अभियंता, खडकवासला जलसंपदा विभाग